| CNRNo.MHWR040010682018 | नोंदणी दिनांक | : | ३०/०७/२०१८ |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | ३०/०७/२०१८ |
| | निकाल दिनांक | : | ११/०८/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष. म. दि.<br>०८ ०० १२ |

**निशाणी क्र.०२ पुढे**

**नमुना क्र.३२**

**पार्ट–अ**

**(न्यायनिर्णयाची शिर्षक पृष्ठ)**

**फौजदारी नियमावली प्रकरण क्र. ६ चा परिच्छेद ४४ (i)**

**सेलु येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**ता. सेलु, जि. वर्धा**

**(पिठासीन अधिकारी – एस.आर.सातभाई)**

न्यायनिर्णय घोषीत दिनांक ११/०८/२०२६

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७७९/२०१८)**

अपराध क्र.१६७/२०१७, पोलीस स्टेशन दहेगांव(गो.), ता.सेलू, जि.वर्धा

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन दहेगांव(गो.), ता.सेलू व जि.वर्धा. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता –<br>श्री. व्ही.व्ही.डोरले |
| **आरोपी** | १. | **पिंटु उर्फ राजेंद्र तानबाजी सुरजुसे,**<br>वय – ३२ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>रा.वार्ड क्र.०१, हमदापूर, ता.सेलू व जि.वर्धा |
| | २. | **पप्पु दत्तुजी गुरनुले,**<br>वय – २० वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>रा. – धानोरा(गोजी), ता. व जि.वर्धा. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | श्री. आर.व्ही.मुन |

**भाग – ब**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २७/१२/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २७/१२/२०१७ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ३०/०७/२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २२/०८/२०२२ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | २२/०८/२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ११/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशांचा दिनांक | :- | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पिंटु उर्फ राजेंद्र तानबाजी सुरजुसे | २८/१२/२०१७ | २८/१२/२०१७ | भा.दं.वि. कलम २९४, ३२३, ५०६ सहकलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | पप्पु दत्तुजी गुरनुले | २८/१२/२०१७ | २८/१२/२०१७ | भा.दं.वि. कलम २९४, ३२३, ५०६ सहकलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग -क

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))**

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार.**

अ. अभियोग पक्ष

| सा. | साक्षीदारांचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | सुनिल वामनराव शिंदे | पंच | ०२ पुढे |
| २. | नितेश बालाजी चौधरी | पंच | ०२ पुढे |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार**

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**न्यायालयीन साक्षीदार**

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

ब. बचाव पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

क. न्यायालयामार्फत निशाणी फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.०३ | साक्षीदार क्र.१ ची घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीला |
| २. | निशाणी क्र.०४ | साक्षीदार क्र.२ ची घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीला |

ड. भौतीक वस्तु

| अनु क्रमांक | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| -- | --- | --- |

# न्यायनिर्णय

**(घोषीत दिनांक : ११/०८/२०२६)**

अभियोगपक्षाने सदर खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २९४, ५०६ व ३२३ सहकलम ३४ अंतर्गत दाखल केला आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे –**

२. दि.२७/१२/२०१७ रोजी फिर्यादी व त्यांच्या सोबत असलेल्या बाया हे मिळुन शेताचे कामे करुन सायंकाळी ०६.०० वाजताच्या दरम्यान मालवाहु ऑटो क्र.एम.एच.३४–ए बी–७४३० ने ढपकी गावाकडे

जात होते. त्यांचा ऑटो हमदापूर ते शिवनगर रोडवरुन जात असतांना हमदापूर येथे राहणारा आरोपी क्र.१ पिंटु तानबाजी सुरजुसे याने त्याचे ताब्यातील मोटरसायकल ऑटोच्या मागुन ओव्हरटेक करीत ऑटोच्या समोर आणुन ऑटो थांबविला व ऑटो चालक यांना साईड का दिली नाही याकारणावरुन हाताबुक्कयांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. तेव्हा फिर्यादी व त्यांच्या सोबत असलेल्या बायांनी भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला असता आरोपी क्र.१ च्या सोबत असलेल्या आरोपी क्र.२ यांनी शिवीगाळ करुन हाताबुक्कयांनी मारहाण केली. तसेच आरोपींनी फिर्यादी यांना व त्यांच्या सोबत असलेल्या इतर बायांना,"साली मादरचोद चुतमारीचे तुझा खुन करतो" अश्या अश्लील शब्दात शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन दहेगांव(गोसावी) येथे फिर्याद दिली. सदरची फिर्याद पोलीस स्टेशन दहेगांव(गोसावी) येथे अपराध क्र.१६७/२०१७ भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३ व ५०६ सहकलम ३४ अन्वये आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला.

३. तपासकामी तपासी अधिकारी श्री. चंदु बन्सोड यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला. आरोपींना अटक करुन अटक फार्म तयार केले. आरोपींविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने, त्यांचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपींविरुद्ध दोषारोप निश्चीत करुन त्यातील मजकूर आरोपींना वाचून दाखविला व त्यांना मराठी भाषेमध्ये समजावून सांगण्यात

आला. आरोपींनी तो अमान्य करुन प्रकरण चालविण्यासाठी विनंती केली. आरोपींविरुद्ध अभियोगपक्षाने नोंदविलेल्या साक्षीपुराव्यातुन गुन्हयाशी संबंधीत कोणताही मजकूर अभिलेखावर आला नाही, त्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ब) नुसार बयान नोंदविण्यात आले नाही. प्रस्तुत प्रकरणात विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही.व्ही.डोरले तसेच आरोपींतर्फे विद्वान वकील आर.व्ही.मुन यांच्या युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभियोगपक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील बाबी विचारार्थ येत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो आहे काय दिनांक २७/१२/२०१७ रोजी हमदापूर शिवार, सेलू, तालुका सेलू व जिल्हा वर्धा येथे सार्वजनिक ठिकाणी इतरांना त्रास होईल अश्याप्रकारे आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादी यांना,"साली मादरचोद, चुतमारीचे तुझा खून करतो" अश्या अश्लील भाषेत शिवीगाळ केली, त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम २९४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | **नकारार्थी** |
| २. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीला स्वेच्छेने मारहाण करुन दुखापत केली, त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली, त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे आरोपी निर्दोष मुक्त.** |

## ...कारणमिमांसा...

६. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द वर नमुद गुन्हे सिध्द करण्यासाठी फक्त दोन साक्षीदार तपासले आहे. अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोपीत गुन्हे सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ नामे सुनिल वामनराव शिंदे (पंच) व साक्षीदार क्र.२ नामे नितेश बालाजी चौधरी (पंच) यांना निशाणी क्र.०२ पुढे तपासले आहे.

७. अभियोगपक्षाने आरोपींवरील गुन्हे सिद्ध करण्यासाठी आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी अश्लील भाषेत शिवीगाळ केली, फिर्यादीच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली तसेच आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीवर हल्ला केला आणि तिला स्वेच्छेने दुखापत केली, हे सिद्ध करणे आवश्यक आहे.

**मुद्दे क्र.१ ते ३ करीता :**

८. वरील सर्व मुद्दे एकाच प्रकारच्या पुराव्यावर अवलंबुन आहेत. त्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे मुद्दे एकत्रात विचारार्थ घेत आहे.

९. अभियोगपक्षाने आरोपींवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.१ सुनिल वामनराव शिंदे यांना निशाणी क्र.०२ पुढे नोंदविलेले आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ते आरोपी व फिर्यादी यांना ओळखत नाही. घटना कधी व काय घडली हे त्यांना माहित नाही. त्यांना पंचनाम्याकरिता पोलीसांकडुन कोठेही बोलविण्यात आले नव्हते. त्यांना सदरचा पंचनामा दाखविण्यात आला, त्या पंचनाम्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे सांगितले. सदरचा साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे न्यायालयाचा परवानगीने सरकारी वकिलांनी त्यांचा उलटतपास घेतला. परंतु त्यामध्ये साक्षीदाराने सर्व प्रतिकुल सूचना नाकारलेले आहे.

१०. अभियोगपक्षाने आरोपींवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.२ नितेश बालाजी चौधरी यांना निशाणी क्र.०२ पुढे नोंदविण्यात आले आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ते आरोपीला ओळखत नाही. दि.२८/१२/२०१७ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनाम्यासाठी कुठेही बोलविले नाही. त्यांच्या समक्ष पंचनामा करण्यात आलेला नाही. त्यांची एका कागदावर सही घेण्यात आली होती. त्यांनी न वाचता सही केली होती. त्यांना सदरचा पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकूराबाबत त्यांना काही माहित नसल्याचे कथन केले. सदरचा साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे न्यायालयाचा परवानगीने सरकारी वकिलांनी त्यांचा उलटतपास घेतला.

परंतु अभियोगपक्षास साक्षीदाराचा उलटतपासात आरोपींविरुध्द उपयुक्त असा कोणताही मजकूर अभिलेखावर आणता आला नाही. त्यामुळे साक्षीदाराची साक्ष आरोपींवरील गुन्हा शाबित करण्यास पुरेशी नाही.

**११.** उपलब्ध साक्षपुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभिलेखावर आलेला नाही. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी यांना वारंवार साक्ष समंस देण्यात आले, परंतु फिर्यादी हे साक्ष देण्यासाठी न्यायालयात हजर झाले नाही, त्यामुळे फिर्याद शाबित झालेली नाही. घटनास्थळ पंच म्हणून तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र.१ व २ यांनी त्यांच्या साक्षीत त्यांच्या समक्ष पोलीसांनी कोणताही पंचनामा केला नाही. तसेच पंचनाम्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहिती नाही असे त्यांनी सांगितले. प्रस्तुतच्या प्रकरणात दोन्ही पंच साक्षीदार हे फितूर झाल्याचे दिसते. त्यामुळे पंचनामा प्रत्यक्ष घटनास्थळी व तत्काळ तयार झाल्याबाबत शंका निर्माण होते. अशा परिस्थितीत घटनास्थळ पंचनामा हे सिद्ध झालेले नाही.

**१२.** सदर प्रकरणात एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेले नाही. फौजदारी खटल्यामध्ये अभियोगपक्षावर आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्याची जबाबदारी असते व केवळ शक्यता, अंदाज अथवा तर्काच्या आधारे आरोपींना दोषी ठरविता येत नाही. तसेच प्रस्तुतच्या प्रकरणात अभियोगपक्षाने तपासी अधिकारी यांना तपासलेले नाही. त्यामुळे

भरपूर सा–या गोष्टया अभिलेखावर आलेल्या नाही. त्यामुळे घटना घडली होती किंवा नाही असे ठामपणे म्हणता येणार नाही. तसेच आरोपींविरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपींनी भा.दं.वि.चे कलम २९४, ३२३ व ५०६ सहकलम ३४ नुसार गुन्हा केल्याची बाब सिध्द झालेली नाही. वरील विवेचनावरुन मी मुद्दे क्र.१ ते ३ चे नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ बाबत :**

**१३.** उपरोक्त पुराव्याचे विश्लेषण करता व एकंदर कायदेविषयी परिस्थितीचा बारकाईने विचार करता, अभियोग पक्ष आरोपींविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून साक्षपुराव्या अभावी संशयाचा फायदा देउन आरोपींची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचित वाटते. परिणामत: मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी क्र.१ **पिंटु उर्फ राजेंद्र तानबाजी सुरजुसे व** आरोपी क्र.२ **पप्पु दत्तुजी गुरनुले** यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१)] अन्वये गुन्हा क्र.१६७/२०१७ भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३ व ५०६ सहकलम ३४ पोलीस स्टेशन दहेगांव(गोसावी), या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपींचे जमानतनामा व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

**३.** आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तीक मुचलका भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ] प्रमाणे दाखल करुन पुर्तता करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.08.11 17:37:29 +0530

**( एस.आर.सातभाई )**

**दिनांक** : ११/०८/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सेलू

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)